# १५. खरा नागरिक

**- सुहास बारटक्के**

**प्र.१ योग्य पर्याय निवडा.**

१. निरंजनचा राहिलेला शेवटचा पेपर होता

अ. इतिहास **ब. नागरिकशास्त्र** क. भूगोल

२. निरंजन वार लावून जेवायचा कारण. . . .

अ. मावशी त्याला जेवायला देत नसे ब. त्याला इतरांकडून आमंत्रणे येत

**क. मावशीची परिस्थिती यथातथा होती**

३. गाडी दीर्घकाळ थांबवण्याचा आदेश यांनी दिला.

**अ. स्टेशनमास्तर** ब. गुरुजी क. निरंजन

४. सरकारी वसतिगृहात निरंजनला प्रवेश देणारे.

अ. भडसावळे गुरुजी **ब. जिल्हाधिकारी** क. मावशी

**प्र.२ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. निरंजनने खराब झालेल्या रुळाविषयी कोणाला सांगिले?**

उत्तर निरंजनने खराब झालेल्या रुळाविषयी स्टेशनमास्तरला सांगितले.

**२. पुलावरुन शेवटची गाडी रात्री किती वाजता जाते?**

उत्तर पुलावरुन शेवटची गाडी रात्री दोन वाजता जाते.

**३. नागरिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी निरंजनला कोणाकडे जेवायला जायचे होते?**

उत्तर नागरिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी निरंजनला देशमुख यांच्याकडे जेवायला जायचे होते.

**४. निरंजन कोणाचा लाडका विद्यार्थी होता?**

उत्तर निरंजन गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता.

**५. निरंजनचा काही दिवस सांभाळ कोणी केला?**

उत्तर निरंजनच्या मामाने काही दिवस सांभाळ केला.

**प्र.३ आकृतीबंध पूर्ण करा.**

**१. पुढील प्रश्नांची उत्तरे निरंजनला पाठ होती.**

१. नागरिकांची कर्तव्ये कोणती?

२. उत्तम नागरिक कोणाला म्हणावे?

३. लोकसभा म्हणजे काय?

४. ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण?

**२. भडसावळे गुरुजींनी निरंजनला केलेली मदत.**

१. वहया पुस्तकांचा खर्च २. जेवणासाठी वार लावून दिले

**३. खऱ्या नागरिकाची कर्तव्ये**

१. कर्तव्यदक्ष  २. तत्परता  ३. सामाजिक बांधिलकी  ४. सेवावृत्ती

**४. स्टेशनमास्तरने केलेल्या कृती**

१. गाडी थांबवण्याचे आदेश  २. घटनेचा पंचनामा करायला सांगणे

**प्र.४ स्वमत / थोडक्यात उत्तरे लिहा.**

**१. निरंजन खरा नागरिक हे विधान तुमच्या शब्दात स्पष्ट करा.**

उत्तर निरंजन हा अतिशय मेहनती आणि अभ्यासू मुलगा होता. आईवडिलांच्या निधनानंतर तो मावशीकडे राहत होता. आपल्या सर्व गुरुजींचा तो लाडका होता. नागरिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी त्याला कोकण रेल्वेरुळावर काही विचित्र खुणा दिसल्या. निरंजनने लगेच ती माहिती स्टेशनमास्तरला दिली. आपल्या स्वार्थाचा व पेपरचा विचार न करता खरा नागरिक म्हणून त्याने आपले कर्तव्य पार पाडले. निरंजनच्या या प्रसंगावधानामुळे एक मोठा अपघात टळला व हजारो लोकांचे प्राण वाचले. म्हणून एका जबाबदार नागरिकाची कामगिरी करणारा निरंजन खरा नागरिक आहे. असे म्हणायला हरकत नाही.

**२. तुम्हाला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्टये लिहा.**

उत्तर आदर्श विद्यार्थी हा अभ्यासात हुशार असायला हवा. तसेच तो खेळात किंवा इतरही कार्यक्रमात सहभागी होणारा असावा. आपल्या गुरुजनांना मान देणारा, त्यांची शिकवण मानून ती आचरणात आणणारा पाहिजे. वडिलधाऱ्या माणसांना मान देणारा, कुटुंबातील सदस्यांची काळजी घेणारा, आईवडिलांवर नितांत प्रेम करणारा व सत्याच्या मार्गावर चालणारा असावा. सर्वांशी मैत्री करणारा, शिस्तप्रिय व सामाजिक बांधिलकी मानणारा असावा. इतरांच्या अडीअडचणी जाणून त्यांच्या सुखदु:खात सहभागी होणारा हवा. थोडक्यात आदर्श विद्यार्थी सर्वगुणसंपन्न असावा.

---